महाराष्ट्र शासनाचा २००४–२००५ या वर्षाचा अंतरिम
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

# वित्त मंत्री, श्री. जयंत पाटील

यांनी मंगळवार, दिनांक १६ मार्च २००४ रोजी
केलेले भाषण

अध्यक्ष महाराज,

आपल्या अनुमतीने सन २००४-०५ या वर्षाचा राज्याचा अंतरिम अर्थसंकल्प मी सभागृहाला सादर करीत आहे.

२. लोकसभेच्या निवडणुका आता जवळ आलेल्या आहेत हे सन्माननीय सदस्यांना माहीत आहेच. या अनुषंगाने केंद्र शासनाने चार महिन्यांच्या कालावधीचे लेखा अनुदान घेतलेले आहे आणि निवडणुका झाल्यानंतर येत्या काही महिन्यांतच केंद्राचा संपूर्ण अर्थसंकल्प सादर होईल अशी अपेक्षा आहे. योजना आयोगाने वार्षिक योजना २००४-०५ च्या योजनेचे आकारमान अद्याप निश्चित केलेले नाही. या पार्श्वभूमीवर मी देखील या अंतरिम अर्थसंकल्पाद्वारे लेखा अनुदानाचा प्रस्ताव सादर करीत आहे. यामध्ये राज्य शासनाचा स्थायी खर्च व चालू असलेल्या योजना राबविण्यासाठी पुढील वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांसाठी आवश्यक असलेल्या खर्चाची तरतूद करण्याचे प्रस्तावित करीत आहे. या सदनाच्या पुढील अधिवेशनात अतिरिक्त अर्थसंकल्प सादर करण्यात येईल, ज्यामध्ये पुढील वर्षाच्या योजनेतर व योजनांतर्गत नवीन बाबींवरील खर्चाचा समावेश असेल.

**स्थूल आर्थिक आढावा.** ३. १९९३-९४ च्या स्थिर किंमतीनुसार राष्ट्रीय पातळीवर देशांतर्गत स्थूल उत्पन्न गेल्या वर्षीच्या ४ टक्के वाढीच्या तुलनेत सन २००३-०४ मध्ये ८.१ टक्क्यांनी वाढेल अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्राचे स्थूल राज्य उत्पन्न गेल्या वर्षीच्या ६.१ टक्के वाढीच्या तुलनेत सन २००३-०४ मध्ये ५.६ टक्क्यांनी वाढण्याची अपेक्षा आहे. राज्याच्या स्थूल उत्पन्नाच्या वाढीच्या दरातील घट ही राज्यातील तीव्र दुष्काळामुळे झाली आहे.

**किंमत निर्देशांक.** ४. अखिल भारतीय घाऊक किंमतीच्या निर्देशांकावर आधारित वार्षिक चलन वाढीचा दर डिसेंबर २००३ करिता ५.६ टक्के इतका आहे. हा दर डिसेंबर २००२ साठी ३.३ टक्के इतका होता. अखिल भारतीय घाऊक किंमतीवर आधारित चलन वाढीचा दर एप्रिल २००३ ते डिसेंबर २००३ या कालावधीकरिता ५.३ टक्के इतका आहे. तो मागील वर्षात तत्सम कालावधीत २.८ टक्के इतका होता.

४.१. औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतीच्या सरासरी निर्देशांकावर आधारित चलन वाढीचा दर चालू आर्थिक वर्षात सुरुवातीला ५.१ टक्के इतका होता. त्यात एकंदरीत घटता कल दिसून आला आणि डिसेंबर २००३ मध्ये तो ३.७ टक्के इतका झाला. औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमतीच्या सरासरी निर्देशांकावर आधारित चलन वाढीचा दर एप्रिल ते डिसेंबर २००३ या कालावधीकरिता ३.८ टक्के इतका आहे. हा मागील वर्षाच्या तत्सम कालावधीच्या निर्देशांकाच्या जवळपास होता.

औद्योगिक उत्पादनाचे निर्देशांक.

५. अखिल भारतीय औद्योगिक उत्पादनाच्या निर्देशांकांमध्ये एप्रिल ते नोव्हेंबर २००३ या कालावधीत मागील वर्षाच्या तुलनेत ६.२ टक्के इतकी वाढ झाली आहे. तसेच वस्तू निर्माण क्षेत्रातील तत्सम कालावधीतील वाढ ६.८ टक्के इतकी होती.

कृषि विद्यापीठातील विद्यार्थीनींना सवलती.

६. सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील कृषि विद्यापीठांतर्गत निरनिराळ्या पदवीपूर्व, पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थीनींसाठी शैक्षणिक व वसतीगृह शुल्क माफ करण्यासाठी अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यासाठी सन २००४-०५ मध्ये रुपये १.८४ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

फळझाड लागवडीसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात माफी.

७. रोजगार हमी योजनेशी निगडित फळझाड लागवड योजनेत जिवंत झाडांची विहीत टक्केवारी न ठेवल्याबद्दल अपात्र शेतकऱ्यांकडून त्यांना दिलेले अनुदान वसूल करण्यात येते. मात्र राज्यात अवर्षण व अतिवृष्टी अशा लागोपाठ आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे अशी वसूली देणे अनेक शेतक-यांना शक्य झालेले नाही. अशा आवाक्याबाहेरील परिस्थितीस शेतकरी स्वतः जबाबदार नसल्याने त्यांना दिलासा देण्याकरिता मार्च २००२ पर्यंत वसूल करावयाची सुमारे रुपये १६२ कोटी इतकी रक्कम पूर्णतः माफ करण्यात आली आहे. याचा लाभ ५.१८ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे.

पशुसंवर्धन.

८. पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे, यांच्यामार्फत राज्यातील अल्प व अत्यल्प भूधारक तसेच दारिद्र्य रेषेखालील सुशिक्षित बेरोजगार लाभार्थ्यांना शेळी मेंढी गटाचे वाटपाची योजना राज्यात राबविण्यात येत आहे. सन २००३-०४ या वर्षात रुपये १० कोटी इतकी रक्कम या महामंडळास अदा करण्यात आली आहे.

**जल प्रदूषण निवारण योजना.** ९. जल प्रदूषण निवारण योजने अंतर्गत गोदावरी नदीवरील त्र्यंबकेश्वर, नाशिक व नांदेड आणि कृष्णा नदीवरील कराड व सांगली या शहरांचा समावेश करण्यात आला आहे. या योजनेवर सन २००३-०४ या वर्षामध्ये रुपये ८.७५ कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आली आहे. सन २००४-०५ या वर्षाकरिता या योजनेसाठी रुपये १३ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिका धारकांना सवलत.** १०. राज्यातील गोर-गरीब जनतेला दिलासा देण्याच्या उद्देशाने दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिकाधारकांना सवलतीच्या दराने तांदूळ उपलब्ध करुन देण्यासाठी सन २००४-०५ या वर्षाकरिता रुपये ५९.१९ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. त्याशिवाय अंत्योदय अन्न योजने अंतर्गत धान्य वाहतूक व वितरणावरील खर्चासाठी सन २००४-०५ या वर्षाकरिता रुपये ३८.५२ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. अन्नपूर्णा योजनेवरील वाहतूक व वितरणावरील खर्च भागविण्यासाठी सन २००४-०५ या वर्षाकरिता रुपये ७.९० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**राज्य पोलीस दलाचे आधुनिकीकरण.** ११. पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाची योजना सन २०००-०१ पासून राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत मोटार वाहने, साधनसामग्री, दळणवळण, प्रशिक्षण, शस्त्रे, पोलीस गृहनिर्माण, इमारत, संगणकीकरण व न्यायसहाय्यक वैज्ञानिक प्रयोगशाळा यांचे आधुनिकीकरण व उन्नतीकरणाचा समावेश आहे. सन २०००-०१ ते २००३-०४ पर्यंत सदर योजनेवर रुपये ४४० कोटी इतका खर्च झाला आहे. सन २००४-०५ या वर्षाकरिता या योजनेसाठी रुपये १८४.२० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

मुंबई येथील वित्रीदेवी फुले हेला वसतिगृह आणि तेलंग ारक मुलींचे वसतीगृहांचा विस्तार व विकास.

१२. सावित्रीदेवी फुले महिला वसतीगृह व तेलंग स्मारक मुलींचे वसतीगृह, मुंबई यांच्या विस्तार व विकास कार्यक्रमासाठी सन २००३-०४ च्या अर्थसंकल्पात रुपये १.२० कोटी इतकी तरतूद मंजूर करण्यात आली. ही तरतूद पूर्णतः खर्च करण्यात आली आहे.

सामुहिक प्रोत्साहन योजना.

१३. सामूहिक प्रोत्साहन योजने अंतर्गत लघु उद्योग घटकांचा दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालन आणि मागासवर्गीय उद्योजकांनी स्थापन केलेले घटक तसेच प्रक्रिया उद्योगाचे बिनव्याजी विक्रीकर कर्ज या बाबीसंबंधातील ३१ मार्च २००२ पर्यंतचा अनुशेष एप्रिल, २००३ मध्ये रुपये १४३ कोटी इतक्या अतिरिक्त रकमेचे वाटप करून भरून काढण्यात आला आहे. अशा अर्थसहाय्यामध्ये विशेष भांडवली अर्थसहाय्य, जकात परतावा व वीजशुल्क परतावा या बाबींचा समावेश आहे.

आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम.

१४. स्थानिक गरजांवर आधारित आमदारांचा स्थानिक विकास कार्यक्रम राज्यात सन १९८४-८५ पासून राबविण्यात येत आहे. सन २००४-०५ या वर्षाकरिता या प्रयोजनार्थ रुपये २९३.६० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

१४.१. या निधीतून घेण्यात यावयाच्या कामांच्या अनुज्ञेय यादीत खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे :—

(१) राज्यात दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी वैरण विकास संचयनी योजनेमध्ये रुपये १५ लाख या मर्यादेत खर्च करता येऊ शकेल.

(२) दुष्काळग्रस्त जिल्ह्यात जेथे जनावरांच्या छावण्या उघडण्यात आल्या आहेत तेथे पाण्याची सोय उपलब्ध करण्यासाठी प्रती आमदार रुपये ५ लाख एवढा निधी वापरता येईल.

**रोजगार हमी योजना.**

१५. सन २००३-०४ या वर्षात रोजगार हमी योजनेवरील एकूण खर्च रुपये ९४७.८१ कोटी इतका असून त्याद्वारे १७ कोटी मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली आहे.

१५.१. राज्यातील ११ जिल्ह्यांत टंचाई सदृश्य परिस्थिती आहे. रोजगार हमी योजनेची परिणामकारक अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने या योजनेचे काही निकष शिथिल करण्यात आले आहेत. टंचाईग्रस्त जिल्ह्यांमध्ये मजूरी अदा करण्यासाठी जिल्हाधिकारी यांना कोषागारातून रक्कम काढण्याचे अधिकार दिलेले आहेत. सन २००३-०४ मध्ये या योजने अंतर्गत ३६,७४९ कामे दिनांक ३१ डिसेंबर २००३ अखेर पूर्ण झ ाली आहेत. सन २००४-०५ या वर्षाकरिता या योजनेकरिता रुपये ३८५ कोटीं इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**राज्यातील दुष्काळी परिस्थिती.**

१६. सन २००३-०४ मध्ये पुणे, औरंगाबाद व नाशिक विभागातील ११ जिल्ह्यांतील ७१ तालुक्यांत सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने खरीप पेरण्यांवर परिणाम झाला तसेच पावसाअभावी रब्बी हंगामातील पेरण्यांवरही परिणाम झाला. तद्वतच पेरण्या झाल्या तेथे उगवण झाली नाही. तसेच पिण्याच्या पाण्याची व गुरांच्या चाऱ्याची टंचाई निर्माण झाली व शेतीची कामे नसल्याने रोजगार हमी योजनेच्या कामांवर मजूर उपस्थितीचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढले. उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता राज्याच्या इतिहासात प्रथमच अंतिम पैसेवारीची वाट न

पाहता खरीप पिकांबाबत हंगामी पैसेवारीच्या आधारावर तसेच रब्बी पिकांबाबत कोणत्याही प्रकारची पैसेवारी न काढता या ११ जिल्ह्यांतील ७१ तालुक्यांतील ६,७३७ गावांमध्ये टंचाई परिस्थिती जाहीर करण्यात आली. टंचाई परिस्थितीत शेतकऱ्यांना अनुज्ञेय सर्व सवलती देण्यात आल्या आहेत. सद्य:स्थितीत राज्यातील ७,४४७ गावे व वाड्यांना २,४३६ टँकर्सने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जात आहे. रोजगार हमी योजनेखाली १२,७३४ कामे सुरू असून ८,१३,८८३ व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे. रोजगार हमी योजनेवरील मजुरांना प्रती माणशी ५ किलो प्रमाणे गहू किंवा तांदूळ याप्रमाणे धान्य वाटप करण्यात येत आहे. तसेच टंचाईग्रस्त भागांमध्ये ६२६ जनावरांच्या छावण्या उघडण्यात आल्या आहेत. त्यामध्ये लहान मोठी अशी एकूण ६,९२,७८० जनावरे दाखल असून त्यांच्या चारा व पाण्याची व्यवस्था केली जात आहे.

१६.१. शासनाने सन २००३-०४ या वर्षामध्ये आतापर्यंत रुपये १२९७.२२ कोटी इतका खर्च केलेला आहे. त्यापैकी रुपये ९४७.८१ कोटी इतका खर्च रोजगार हमी योजनेवर, रुपये १९६ कोटी इतका खर्च पाणी टंचाईवर आणि रुपये १५३.४१ कोटी इतका खर्च चारा टंचाईवर केला आहे.

**केंद्राची अपुरी मदत.**

१७. वरील परिस्थिती लक्षात घेऊन राज्य शासनाने केंद्र शासनाकडे रुपये १,७१२ कोटी व १० लाख मेट्रीक टन धान्याचे सहाय्य मागितले होते. तथापि, केंद्र शासनाने सुरवातीस रुपये ४४ कोटी व २ लाख मेट्रीक टन धान्याचे सहाय्य दिले. तदनंतर मा. मुख्यमंत्री व अन्य मंत्री

महोदयांनी मा. उपपंतप्रधान यांना अधिक सहाय्याची विनंती केली. त्यानंतर केंद्र शासनाने रुपये ३३ कोटी व २ लाख मेट्रीक टन धान्याचे सहाय्य केले. केंद्र शासनाचे अपुरे सहाय्य उपलब्ध झाले असताना सुध्दा राज्य शासनाने वरील उपाययोजनांवर मोठ्या प्रमाणावर खर्च करून दुष्काळग्रस्तांना दिलासा दिलेला आहे.

**कृषि संजीवनी योजना.**

१८. दुष्काळामुळे आर्थिक अडचणीमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना वीजेच्या थकबाकीतून दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने कृषी संजीवनी योजना राज्यात राबविली असून रुपये ३,००० कोटी इतक्या एकूण थकबाकीपैकी शेतकऱ्यांनी मूळ मुद्दलाच्या ५० टक्के म्हणजे रुपये १,००० कोटी भरल्यास शासनातर्फे अशा शेतकऱ्यांना रुपये २,००० कोटी पर्यंत रकमेची सवलत देण्याचे ठरविले असून ही रक्कम राज्य शासनातर्फे वीज मंडळास देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील थकबाकीदार शेतकऱ्यांनी फेब्रुवारी २००४ अखेर रुपये ४२१ कोटी इतकी रक्कम वीज मंडळाकडे भरली आहे.

**टंचाईग्रस्त भागासाठी योजना.**

१९. राज्यातील ज्या गावामध्ये सलग तीन वर्षे दुष्काळ असून ५० पैशाच्या आतमध्ये आणेवारी आहे अशा शेतकऱ्यांचे १०० टक्के वीजेचे चालू बील शासनातर्फे भरण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे.

**महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्प.**

२०. महाराष्ट्र शासन हे राज्यातील जनतेला विशेषतः ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सेवा पुरविण्यामध्ये नेहमीच अग्रेसर राहिलेले आहे. राज्यातील द्वितीय स्तर रुग्णालयांतील आरोग्य सुविधांचा गुणात्मक दर्जा उंचावून ही रुग्णालये प्रभावीपणे कार्यान्वित करण्यासाठी शासनाने जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने सन १९९८-९९ पासून

महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्प हाती घेतला आहे. प्रकल्पाची सुधारित किंमत रुपये ६५० कोटी असून हा प्रकल्प मार्च २००५ अखेर पूर्ण होणे अपेक्षित आहे. सदर प्रकल्पांतर्गत जानेवारी २००४ अखेर एकूण रुपये ३२३ कोटी इतका खर्च झाला आहे. सदर प्रकल्पांतर्गत ५० ग्रामीण रुग्णालयांचे ५० व १०० खाटांचे रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्यात आले आहे. या शिवाय २५ जिल्हा व ३५ ग्रामीण रुग्णालयांच्या इमारतींचे नूतनीकरण व विस्तारीकरण करण्यात येत आहे. या प्रकल्पाकरिता सन २००४-०५ या वर्षाकरिता रुपये १२२.५५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना.**

२१. स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजना ही दारिद्र्य निर्मूलनाची योजना आहे. या योजनेमध्ये केंद्र व राज्य यांच्या हिश्याचे प्रमाण ७५:२५ असे आहे. सदर योजनेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून ३,०२,३६६ एवढया स्वरोजगारींना लाभ देण्यात आलेला आहे. त्यापैकी ७१,१९० अनुसूचित जातींच्या व ५३,६७१ अनुसूचित जमातींच्या स्वरोजगारींना अर्थसहाय्य देण्यात आले आहे. तसेच १,३३,३४४ महिला स्वरोजगारींनाही या योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

२१.१. सन २००३-०४ मध्ये या योजनेवर रूपये ३९.८५ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. सन २००४-०५ या वर्षाकरिता रुपये २४.२५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना.**

२२. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना सन २००२-०३ पासून राज्यभर पूर्णपणे एकात्मिक स्वरुपात राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत रोजगाराचा भाग म्हणून मजुरांना दारिद्र्य रेषेखालील सवलतीच्या

दराने ५ किलोग्रॅम अन्नधान्य प्रती व्यक्ती प्रती दिन वाटप करण्यात येत असून, उर्वरित मजुरी रोखीने प्रदान करण्यात येत आहे. या योजनेचा प्राथमिक उद्देश अतिरिक्त रोजगार निर्मिती करुन धान्य सुरक्षा देणे असा असून, ही योजना स्थानिक क्षेत्रात व आसपास अकुशल काम करण्यास तयार असलेल्या सर्व ग्रामीण गरिबांसाठी उपलब्ध आहे.

२२.१. या योजने अंतर्गत जानेवारी २००४ अखेर एकूण रुपये २८२.६१ कोटी इतका खर्च झालेला असून त्याद्वारे ३.८७ कोटी मनुष्यदिन निर्मिती झालेली आहे. तसेच कामावरील मजुरांना मजुरीचा भाग म्हणून एकूण २.१० लाख मेट्रिक टन अन्नधान्याचे वाटप करण्यात आलेले आहे. सन २००४-०५ या वर्षाकरिता रुपये ९६.६२ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**आदिवासी अपंग विद्यार्थी शिष्यवृत्ती.**

२३. इयत्ता ८ वी ते १२ वीत शिकणाऱ्या अपंग आदिवासी विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ५०० शिष्यवृत्ती व रुपये १०० प्रमाणे वाहतूक भत्ता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सन २००३-०४ या वर्षामध्ये या प्रयोजनार्थ रुपये १० लाख इतका खर्च करण्यात आला असून त्याचा लाभ २०० आदिवासी विद्यार्थ्यांना मिळाला आहे.

**अपंगांच्या शाळांना अनुदान.**

२४. विना अनुदान तत्वावर चालविल्या जाणाऱ्या राज्यातील ११३ अपंगांच्या अशासकीय शाळांना अनुदान तत्वावर आणण्यात आले आहे. सन २००३-०४ मध्ये आतापर्यंत रुपये १.०३ कोटी इतका खर्च झाला आहे. सन २००४-०५ साठी रुपये ११.९२ कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान**

२५. संत गाडगेबाबा स्वच्छता अभियानाने ग्रामीण व शहरी भागात जनचळवळीचे स्वरूप धारण केले आहे आणि पाणीपुरवठा व स्वच्छता या पलिकडे जाऊन समाज जागृती व सहभागाद्वारे सर्वांगीण विकास साध्य करण्याकडे वाटचाल करीत आहे. सन २००४-०५ या वर्षाकरिता ग्रामीण अभियानासाठी रुपये ३ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान.**

२६. ग्रामीण जनतेचा संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाला मिळालेला प्रचंड प्रतिसाद पाहून संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान व त्या अंतर्गत पंडित जवाहरलाल नेहरु पुरस्कार सन २००२-०३ पासून सुरु करण्यात आले आहेत. नागरी जनतेच्या मोठ्या प्रमाणातील प्रतिसादाने प्रेरित होवून शासनाने हे अभियान यापुढे दरवर्षी राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या अभियानासाठी सन २००४-०५ या वर्षाकरिता रुपये ३ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**अर्थसंकल्पीय अंदाज २००४-०५.**

२७. सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पामध्ये महसुली जमा रुपये ४०,१५७.१७ कोटी व महसुली खर्च रुपये ४७,९०४.३९ कोटी अंदाजित केलेला असून महसुली तूट रुपये ७,७४७.२२ कोटी इतकी राहील. या तूटीमध्ये राज्यमार्ग निधी व रोजगार हमी निधीकडे हस्तांतरीत केलेल्या रुपये २,६०८ कोटी इतक्या तरतूदीचा समावेश आहे.

२७.१. सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पामध्ये एकूण रुपये २,६७६.३९ कोटीची शिल्लक अपेक्षित असून त्यात वर्षाअखेरची रुपये ९४९.९६ कोटींची तूट व अर्थसंकल्पात तरतूद करण्यात न आलेल्या कोअर प्लॅनमधील रुपये १,६७२.८१ कोटींचा नियतव्यय विचारात घेता एकूण शिल्लक रुपये ५३.६२ कोटी इतकी होईल अशी अपेक्षा आहे.

समारोप २८. सन २००४-०५ या वर्षीचा योजनांतर्गत नियतव्यय अजूनही निश्चित झालेला नसल्यामुळे या अर्थसंकल्पामध्ये सन २००४-०५ या वर्षी हाती घ्यावयाच्या योजनांतर्गत खर्चाच्या नवीन बाबींचा समावेश नाही. पुढील वर्षाचा योजनांतर्गत नियतव्यय लोकसभा निवडणुकीनंतर लवकर निश्चित केला जाईल अशी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे या अंतरिम अर्थसंकल्पामध्ये ज्या योजनेतर नवीन बाबींचा समावेश करण्यात आलेला नाही अशा बाबींचा समावेश पुढील अधिवेशनात सादर करावयाच्या अतिरिक्त अर्थसंकल्पामध्ये करावा लागेल.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**